# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk2a@dte.org.in, Internet :http/www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे

क्रमांक : २अ/एडीएस/प्रवेश प्रक्रिया/२०१८/ ६६३
दिनांक : 29 MAY 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशाकरीता सर्व व्यावसायिक पदविका/पदव्युत्तर पदविका/पदवी /पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या मान्यता व संलग्निकरणाबाबतची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याबाबत....

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार असून सदर प्रवेश प्रक्रिया बिनचूक व सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने आपल्या अधिनस्त कार्यरत संस्थांमध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद,नवी दिल्ली, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली, कॉन्सिल ऑफ आर्कीटेक्चर, नवी दिल्ली यांचेकडून नवीन अभ्यासक्रमांना दिलेली मान्यता, सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत वाढ/घट, अभ्यासक्रम बंद करणे,अभ्यासक्रमाच्या नावातील बदल, संस्थेच्या नावात बदल,संस्थेच्या स्थळातील बदल, संस्था बंद झाली असल्यास मान्यतेचे पत्र, अल्पसंख्यांक बदल, को-एज्युकेशन बदल,मान्यता असलेल्या अभ्यासक्रमांना पुढे चालू ठेवण्याबाबतची परवानगी (EOA) इत्यादीबाबत शासनाने दिलेली मान्यता तसेच सदर अभ्यासक्रमांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ व संबंधित विद्यापिठाकडून प्राप्त झालेले संलग्नीकरणाबाबतचे पत्र आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या सर्व व्यावसायिक पदविका/पदव्युत्तर पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थाना संचालनालयाच्या संकेतस्थळावर लॉगइन केल्यानंतर Control Institute Menu→Upload Affiliation/Approval files द्वारे त्वरीत अपलोड करण्याबाबत सूचित करण्यात यावे.

तसेच सर्व मान्यताप्राप्त संस्थांना असेही कळविण्यात यावे की, त्यांनी सदर बदल केल्यानंतर त्यांची संकेतस्थळावरील माहिती तपासून घ्यावी. या शैक्षणिक वर्षापासून लॉगइन करताना SMS व Email द्वारे लघुसंदेश पाठविण्यात येणार असल्याने संस्थाप्रमुखांनी त्यांचे भ्रमणध्वनी (Mobile) व ई-मेल वेळोवेळी अद्ययावत करण्यात यावे व त्यांच्या लॉगईनद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीसाठी ते सर्वस्वी जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. या संदर्भात सुरक्षिततेच्यादृष्टीने प्राचार्यांनी पासवर्ड बदलविणे व तो गुप्त ठेवणे आवश्यक राहील याची प्रामुख्याने नोंद घेण्यात यावी.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

---

महत्वाचे

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१८/ ९८८२
दिनांक : 31 MAY 2018

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुखांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशा करिता व्यावसायिक पदविका/पदव्युत्तर पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या मान्यता व संलग्नीकरणाबाबतची माहिती संचालयनालयाच्या संकेतस्थळांवर अपलोड करण्याबाबत संदर्भीय पत्रात दिलेल्या सुचिनेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी.

30/5
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना प्रत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.